EAGLE LEAP

International Publication

EDITED BOOK

# "WOMEN EMPOWERMENT, WOMEN LAWS AND EDUCATION IN INDIA"








*Editor :-*

**Dr. Vilas Aba Gaikwad**


Scanned with OKEN Scanner

# "WOMEN EMPOWERMENT, WOMEN LAWS AND EDUCATION IN INDIA"

*Editor :-*

**Dr. Vilas Aba Gaikwad**

EAGLE LEAP

Scanned with OKEN Scanner

Title : **Women Empowerment, Women Laws And Education In India**

Editor's : **Dr. Vilas Aba Gaikwad**
Education-M. A. Public Administration, SET, NET, Ph.D. Associate Professor and Head of Department of Public Administration, Matoshri Shantabai Gote College Washim District Washim.

Publisher : **Sandesh Dadarao Pahulkar**
Address **Chinchwad, Pune MH 411033**

Pritinting & Publish : **Eagle Leap Printers And Publisher Pvt. Ltd.**
**SNO 57/4/5 Balaji Colony, Nr. Hamuman Mandir,**
**Bijali Nagarshivnagar, Chinchwad,**
**Pune MH 411033**
**Contact: 8600071634**
**Email: eagleleap.pp@gmail.com**

ISBN : **978-81-963340-4-8**

Publishing Date : **20/09/2023**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means without permission.

9 788196 334048

Scanned with OKEN Scanner

# INDEX


| | | |
|---|---|---|
| ०१. | महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण<br>- प्रा सुरेन्द्र हरीभाऊ किन्हीकर | 08 |
| ०२. | रमाबाई महादेवराव रानडे यांनी सेवासदन द्वारे स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले कार्य : ऐतिहासिक अभ्यास<br>- डॉ नितीन उल्हासराव सराफ | 14 |
| ०३. | महिला सबलीकरण आणि प्रशासकीय कायद्यातील तरतूदी एक अभ्यास - डॉ. बालाजी कोंकटवार | 20 |
| ०४. | भारताच्या विकासात महिला सबलीकरणाचा प्रभाव<br>- प्रा.डॉ. दयानंद उत्तमराव राऊत | 26 |
| ०५. | महिला सबलीकरणाचे घटक आणि आर्थिक विकास<br>- प्रा.दीक्षित साहेबराव ज्ञानोबा | 31 |
| ०६. | सावित्रीबाई फुले यांची कविता आणि महिला सक्षमीकरण<br>- डॉ. विष्णू नामदेव लांडे | 37 |
| ०७. | स्वातंत्र्य पूर्वकाळातील भारतातील महिला विषयक कायदे<br>- प्रा. डॉ. बी. आर. तनपुर | 43 |
| ०८. | मुस्लीम महिलांचा राजकीय सहभाग<br>- प्रा. डॉ. बबिता येवले | 50 |
| ०९. | भारताच्या विकासात महिला सबलीकरणाचा प्रभाव<br>- प्रा.डॉ. दयानंद उत्तमराव राऊत, | 57 |
| १०. | महिला शिक्षण आणि त्याचा महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम - प्रा. कु. पल्लवि रामेशराव देशमुख | 62 |
| ११. | ७३ वी घटना दुरुस्ती आणि महिला सक्षमीकरण<br>- प्रा. डॉ. शरण शिवरुद्रप्पा निलंगेकर | 65 |
| १२. | महिला सबलीकरण एक सक्रिय प्रक्रिया<br>- प्रा. रंजना अनक्षिणे | 68 |
| १३. | महिला सक्षमीकरणामधील समस्या व त्यावरील उपाययोजना<br>- प्रा. डॉ. संकेत सुरेश काळे | 73 |
| १४. | नारी स्वतंत्रता का एक कड़वा सच<br>- डॉ. फिरोज एस खान | 79 |
| १५. | सच के आईने में महिला सशक्तिकरण कल और आज<br>- डॉ अनूप सिंह | 82 |




Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 16. | **Empowering Through Education: The Dynamic Link Between Women's Education and Economic Empowerment in India**<br>- Vivek Sanjay Pawar, | 85 |
| 17. | **Nayantara Sehgal : Feminist concerns seeking independent existence of women**<br>- Dr.Prachi Sharad Patharkar, | 98 |
| 18. | **Participation Of Women In Politics & Policy Making At Gross Root Level An Analysis**<br>- U. Gangadhar, | 103 |
| 19. | **Role of Government in Women Empowerment An Administrative Study**<br>- Prof. Dr. J.U. Hatkar, | 112 |
| 20. | **Sudha Murty: An Icon of Women Empowerment in 21st Century**<br>- Dr Satyendra Gadpayale, | 118 |
| 21. | **The Digital Gender Divide : Women's Access To Technology And Education.**<br>- Anand Uttam Palaspagar, Dr. Sushant Dhanraj Chimne | 122 |
| 22. | **The Role of Women's Education in Empowerment in India**<br>- Dr. Deepak Subhash Waghmare, | 129 |
| 23. | **Women Empowerment and Higher Education Perspectives, Challenges & Strategies**<br>- M. Saraswathi | 135 |
| 24. | **Women's empowerment with NEP 2020**<br>- Shachi Shastri, | 144 |
| 25. | **Women's Education and Media Representation: Challenges and Opportunities**<br>- Dr . Prashant Diwakar Satpute, | 153 |
| 26. | **Women's Education and Economic Development** - Dr. Ajay B. Patil | 163 |




Scanned with OKEN Scanner

# 01 महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण

**प्रा सुरेन्द्र हरीभाऊ किन्हीकर,**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, जि अमरावती.
Mobile No. 9421786488
Email : skinhikar2@gmail.com

**गोषवारा :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतातील महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण या विषयावर प्रकाश टाकण्यात येत असून भारतीय महिलांचा शिक्षणाविषयी अभ्यास तसेच राजकीय सक्षमीकरणाचा सुद्धा अभ्यास करण्यात येत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या काळात खूप कमी स्त्रिया शिक्षण घेत होत्या. शिक्षणाकरीता मोजक्याच घराण्यातील स्त्रिया शाळांमध्ये प्रवेश घेत होत्या. तेव्हाची भारतातील सामाजिक परिस्थिती, चालीरीती, अंधश्रद्धा, बालविवाह, सतीप्रथा अशा जाचक अटींमुळे स्त्रिया घराबाहेर पडत नव्हत्या. त्यामुळे भारतातील बऱ्याचशा महिला या शिक्षणापासून वंचित राहिल्या. देशातील मोठ्या घराण्यातील स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली होती. आज बऱ्याच घराण्यातील स्त्रियांनी शिक्षण घेऊन सामाजिक, राजकीय कार्यात सहभाग घेतला. भारताच्या संविधान निर्मितीमध्ये सुद्धा स्त्रियांचा सहभाग होता. सामाजिक कार्यात सुद्धा या स्त्रिया कार्य करू लागल्या, राजकारणात सुद्धा भाग घेऊ लागल्या.शिक्षणामुळे स्त्री आपले विचार मुक्तपणे मांडू लागली. स्वातंत्र्यानंतर तर भारतीय संविधानामध्ये शिक्षणाचा मूलभूत अधिकारच सर्वांना दिल्या गेल्यामुळे देशातील स्त्रियांना शिक्षणाची दारेच खुली केली गेली. याचा परिणाम म्हणून भारतात सुशिक्षित स्त्रियांची संख्या दरवर्षी वाढू लागली. भारताच्या संसदेत व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात महिलांची संख्या कमी होती. मोजक्याच घराण्यातील महिला या राजकारणात सहभागी होत असत. त्यामुळे राजकीय दृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण झाले नाही.

महिला आरक्षण विधेयकाची मूळ कल्पना १९९३ मध्ये मंजूर झालेल्या घटना दुरुस्तीतून उद्भवली आहे. या घटना दुरुस्तीद्वारे ग्रामपंचायतीच्या सरपंचांची १/३ संख्या महिलांसाठी राखीव असल्याची तरतूद केली होती. महिला आरक्षण विधेयकाकडे लोकसभा आणि राज्य विधानमंडळामध्ये या प्रकारच्या महिला आरक्षणाचा विस्तार करण्यासाठी दीर्घकालीन योजना म्हणून पाहिले जाते. या कायद्यामुळे लोकसभा व



Scanned with OKEN Scanner

राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव आहेत. या कायद्यामुळे राजकारणात महिलांचा सहभाग वाढला व महिलांचे राजकीय सक्षमीकरण होण्यास मदत झाली.

**प्रस्तावना :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांचे शिक्षण तसेच महिलांचे राजकीय सक्षमीकरण आणि स्वातंत्र्यानंतर महिलांचे शिक्षण व त्यांचे राजकीय सक्षमीकरण या पैलूंवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. आज भारतात स्त्रिया समाजातील विविध क्षेत्रात अव्वल स्थानी पोहचलेल्या असून त्या सक्षम बनलेल्या आहेत, मग ते सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक किंवा शैक्षणिक क्षेत्र असो. आज भारताच्या संसदेत व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला दिसू लागलेल्या आहेत. १९९३ च्या ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामीण भागातील महिलांचे राजकीय क्षेत्रात येण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते. परिणामी लोकसभेत सुद्धा स्त्रियांचे ३३ टक्के प्रमाण आहे. जी स्त्री घरापुरतीच मर्यादित होती. ती स्त्री आज देशाच्या उच्च पदावर विराजमान झालेली आपणास पहावयास मिळते. भारतीय संविधानाने जरी स्त्री–पुरुषांना समानतेचा मूलभूत अधिकार दिला असला तरी समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान दिलेले दिसते. शिक्षणामुळे स्त्रिया स्वतःच्या पायावर जरी उभ्या राहत असल्या तरी समाजात पाहिजे तसे मानाचे स्थान तिला अजूनही प्राप्त झालेले नाही.

**महिला शिक्षण :**

भारतात मुलांच्या बरोबरीने मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे की नाही यावर स्वातंत्र्यपूर्व काळात देशभर मोठा उहापोह झाला होता. समाजातील काही घटक मुलींच्या शिक्षणाच्या विरोधात होते. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाईनी शिक्षणाला विरोध करणाऱ्या घटकाशी झगडून इ.स. १९४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा पुणे येथे सुरू केली. इ.स.१९२० मध्ये महर्षी वि.रा. शिंदे यांनी प्राथमिक शिक्षण मुलांप्रमाणेच मुलींसाठीही सक्तीचे करावे असा विचार मांडला. सर्व मुलींना शिक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी पुणे येथेच मोर्चा काढावा लागला. रमाबाई रानडे, जनाक्का शिंदे अशा अनेक महिला या मोर्चात सहभागी होत्या. सर्व मुलींपर्यंत किमान प्राथमिक शिक्षण तरी पोहोचावे यासाठी रस्त्यावर येत होत्या. तरी समाजातील काही घटकाचा त्यांना विरोध सुरू होता. अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळातील मुलींच्या शिक्षणासाठी अनेक संघर्ष समाजातील नेते मंडळी करत होती. स्वातंत्र्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानामध्ये सार्वजनिक जीवनात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क दिले. याचा परिणाम समाजामध्ये असा झाला की, स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची, शिक्षणाची संधी प्राप्त झाली. शिक्षणामुळे स्त्रियांना बरेच काही कळू लागले. स्त्रिया राजकारणात येऊ लागल्या. शिक्षणामुळे स्त्रियांचा विकास होण्यास मदत झाली. जी स्त्री घरादारापर्यंतच मर्यादित दिसत होती, आता ती शिक्षणामुळे घराबाहेर पडू लागली. स्त्रिया आपले स्वतंत्र विचार

समाजासमोर मांडू लागल्या.

**राजकीय सक्षमीकरण:**

महिलांचा राजकारणातील सक्रिय सहभाग हा नेहमीच चर्चेचा विषय राहिलेला आहे. भारतात अगदी आर्यांच्या काळापासून स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान आहे. ऋग्वेदात महिलांना राजकारणात स्थान असल्याचेही दर्शविले आहे. उपनिषद व पुराणकाळात ते कायम होते. परकीय आक्रमणानंतरही काही स्त्रिया भारतीय राजकारणात दिसतात. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक भारतीय स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर अनेक महिलांनी राजकारणात अनेक महत्त्वाची पदे भूषविली आहेत. तेराव्या शतकात राज्यकारभाराची सूत्रे महिलांच्या हाती गेल्याचे आपण पाहतो.

उदा. इ.स. १२३६ ते १२४० या काळात रजिया सुलताना, इ.स. सन १५२४ ते १५६४ मध्ये गोंडवाना संस्थानाची महाराणी दुर्गावती, १६ व्या शतकात चांदबिबी, १७ व्या शतकात राजकारणाला नवी दिशा देणारी जिजाबाई, करविरवासीनी महाराणी ताराबाई, इ.स. १७७६ ते १७९५ मध्ये अहिल्याबाई होळकर, इ.स. १७७८ ते १८२९ कर्नाटकातील कित्तूरची राणी चन्नम्मा, २० व्या शतकातील मादाम कामा, कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, अहिल्या रांगणेकर, कमल देसाई, सुचेता कृपलानी, बेगम एजाज रसुल पासून राजकुमारी अमृतकौर, श्रीमती दुर्गाबाई देशमुख दक्षिणानी वेलायुधन, अम्मो स्वामीनाथन, रेणुका रे, मालती चौधरी, पौर्णिमा चौधरी, राणी लक्ष्मीबाई, राणीअवंती बाई, बेगम हजरत महल इत्यादी स्त्रिया राजकारणात सक्रिय होत्या, भारतातील राजकारणातील महिलांचा सहभाग काळाच्या ओघात नि: संशय वाढला आहे.

स्वातंत्र्यानंतर स्त्री आणि पुरुष दोघांना समान राजकीय व नागरी हक्क प्रदान केले आहे. त्यामुळे स्त्रियांना राजकारणात येण्याची संधीच प्राप्त झाली. देशाचे पंतप्रधानपद, मुख्यमंत्रीपद, राष्ट्रपतीपद ,राज्यपालपद, मंत्रीपद, पक्षाध्यक्ष अशी अनेक पदे भारतातील महिलांनी उत्कृष्ठ पणे सांभाळल्याची उदाहरणे आपणास पहावयास मिळतात. यात सरोजिनी नायडू (राज्यपाल, मुख्यमंत्री), राजकुमारी अमृतसर (पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री), मीरा कुमार (लोकसभा सभापती), इंदिरा गांधी (पहिल्या पंतप्रधान), प्रतिभा पाटील (पहिल्या राष्ट्रपती), सुशीला नायर (विधानसभा स्पीकर), सरोजिनी नायडू (राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष) इत्यादी महिलांनी विविध राजकीय पदांवर कामे केली.

इ.स. १९६३ पासून भारतात १६ महिला मुख्यमंत्री झाल्या. १९७५ हे संयुक्त राष्ट्रसंघांनी 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' आणि इ.स. १९७५ - १९८५ ला 'महिला दशक' म्हणून घोषित केले. तेव्हापासून जगात महिला सक्षमीकरणाला बळ मिळाले. इ.स. १९७५ नंतरच्या काळात महिला वर्ष आणि विविध स्त्री सहभागाचा प्रभाव पुढील काळातील महिला विकासाला नवीन दिशा देणारा ठरला. इ.स. १९८८ मध्ये राजीव गांधी सरकारने



Scanned with OKEN Scanner

राजकीय संस्थांमध्ये ३३ टक्के जागांवर स्त्रियांची नेमणूक करावी असे सुचविले. ७३ आणि ७४ वी घटनादुरुस्ती केल्याने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज मध्ये ३३ टक्के आरक्षण हे जागा व पदांवर देण्यात आले. त्यामुळे भारतात दहा लाख स्त्रिया विविध पदांवर विराजमान झाल्या. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे संसदेतही स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण मिळावे, अशी मागणी महिला करू लागल्या. आता तर हे ३३% आरक्षण नको तर ५०% आरक्षण मिळावे. अशी मागणी विविध महिलांनी नेत्या व संघटना करू लागल्या. पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३% वरून ५०% आरक्षण देणारे पाचवे राज्य महाराष्ट्र ठरले.

१४ एप्रिल २०११ मध्ये महाराष्ट्र सरकारने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिवशी विधिमंडळात ठराव पारित केला. केंद्र सरकारने सुद्धा २०१६ पासून पंचायतराज मध्ये महिलांचे आरक्षण ३३ % वरून ५०% केले आहे. यामुळे संपूर्ण भारतात स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायतराज मध्ये महिलांना ५०% आरक्षण मिळाले. ५०% आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील महिला राजकारणात सहभाग घेऊ लागल्या. ५०% आरक्षणामुळे महिलांचे राजकीय सक्षमीकरण होण्यास सहाय्य झाले. चुल व मुल यापूरतीच मर्यादित असणारी स्त्री ही आता गावाच्या राजकारणात सरपंच, सदस्य, सभापती पदांपर्यंत पोहचू लागली. ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती ही महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाकरिता क्रांतिकारी पाऊल ठरले. ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे आदिवासी महिलांचे पंचायतराज संस्थेतील प्रमाण वाढले. आज सरपंच पदापासून तर देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत महिलांचा राजकीय सहभाग दिसून येत आहे. भारतातील अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांमध्ये महिलांना आमदार, खासदार, इतर लोकप्रतिनिधी म्हणून उमेदवारी दिली जात आहे. बऱ्याच महिला या निवडून देखील येत आहेत. त्यामुळे पक्षामध्ये सुद्धा महिलांचे प्रमाण वाढू लागले आहे.

देशाच्या १९५२ च्या पहिल्या लोकसभा निवडणुकीचा विचार करता ४९९ जागांपैकी २२ महिला सदस्य होत्या. त्यांचे एकूण प्रमाण ४.४ % इतके होते. हळूहळू लोकसभेत महिला सदस्यांचे प्रमाण कमी अधिक दिसू लागले. परंतु २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ५४२ सदस्य संख्या असलेल्या लोकसभेत ७६ महिला निवडून आल्या. त्यांचे प्रमाण १४.२% होते. भारतातील पहिल्या लोकसभा निवडणुकीचा विचार करता २०१९ च्या सतराव्या लोकसभा निवडणुकीत महिलांचे निवडून येण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते. तसेच देशाच्या १९५२ च्या मंत्री परिषदेत एकूण दोनच महिला मंत्री होत्या. देशातील इतर पक्षांच्या मंत्रिपरिषदेत महिला मंत्र्यांची संख्या ही वेगवेगळी असलेली दिसून येते.

१९९१,१९९९, २००४, २००९, २०१४ व २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महिला मंत्र्यांची संख्या ही थोडीफार वाढलेली आहे. २०१९ च्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्री परिषदेत ११ महिला या मंत्री आहेत. यामध्ये स्वातंत्र्यानंतर



Scanned with OKEN Scanner

प्रथमच इतक्या जास्त महिला कॅबिनेट मंत्री पदावर आल्या. अशा प्रकारे महिलांचे राजकीय सक्षमीकरण झाल्याचे दिसून येते.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत झालेल्या सतरा निवडणुकांमध्ये मात्र हळूहळू महिलांचे उमेदवार म्हणून लोकसभेच्या निवडणुकीत निवडणूक लढविण्याचे प्रमाण वाढलेले आहे. पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील महिलांचा सहभाग दिवसेंदिवस वाढतच आहे. यावरून असे दिसून येते की, महिला या ग्रामीण भागापासून तर देशाच्या राष्ट्रीय राजकारणापर्यंत विविध पदांवर कार्य करीत आहेत. महिला सक्रिय राजकारणात आल्यामुळे त्यांचा परंपरागत सामाजिक दर्जा व भूमिकेमध्ये परिवर्तन होऊन त्यांचे सामाजिक स्थान उंचावले आहे. राजकीय सहभागामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्याचे पाहावयास मिळते. आत्मविश्वासामुळे कोणत्याही संकटावर मात करता येत असल्यामुळे त्यांचे सक्षमीकरण होते. देशातील काही महिला लोकप्रतिनिधी आपली भूमिका सक्षमपणे पार पाडत आहे. महिला आरक्षणामुळे समाजातील वंचित घटकाला सुध्दा राजकारणात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.

**निष्कर्ष :**

महिलांच्या सक्षमीकरणाकरीता शिक्षण हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात महिलांना समान हक्क दिल्यामुळे विकास झाला आहे. स्त्री सक्षमीकरणाकरीता राजकीय सहभाग देखील तेवढाच महत्त्वाचा आहे. राजकीय सहभागातून सत्ता प्राप्त होत असल्यामुळे प्रश्नांची सोडवणूक करता येते, निर्णय घेता येतात.

प्रस्तुत शोधनिबंधावरून असा निष्कर्ष काढता येतो की, आज स्त्रियांचे प्रश्न संपलेले नाही, अजूनही समाजातील त्यांची उपेक्षा थांबलेली नाही. समाजातील काही घटक स्त्रियांना राजकारणात येण्यापासून परावृत्त करीत आहे. समाजातील वंचित स्त्रियांचे आजही शोषण व उपेक्षा होत असताना दिसते. जर एखादी महिला उच्च राजकीय पदावर असली तर समाजात त्या महिलेची अवहेलना करताना आपल्याला दिसून येते. राजकारणात महिलांना कुटुंबाची साथ मिळणे आवश्यक आहे. आज समाजातील मोजक्याच घराण्यातील स्त्रिया राजकारणात सहभागी होताना दिसतात. अजूनही राजकारणाविषयी देशातील महिला पूर्णतः जागरूक झालेल्या नाही. निवडणुकीत जरी स्त्री मतदारांची संख्या वाढत असली तरी प्रत्यक्ष राजकीय पदावर स्त्रियांची संख्या कमी दिसते.

राजकारणातील स्त्रियांवर कुटुंबाचा प्रभाव आपणास पहावयास मिळतो. भारतातील संसदेमध्ये महिलांचे प्रमाण जगातील इतर देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. इंटर पार्लमेंटरी युनियन या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अहवालानुसार जगातील संसदेतील महिलांच्या प्रमाणाबाबत भारताचा क्रमांक १०८ वा लागतो. आज असे दिसून येते की, महत्त्वाच्या राजकीय पदांवर पुरुषांचीच मक्तेदारी राहिली आहे. संसदेच्या सभागृहात महिलांना प्रतिनिधित्व जरी मिळाले तरी निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान दुय्यम असल्याचे दिसून येते.



Scanned with OKEN Scanner

भारतात महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला असला तरी महिला राजकीय दृष्ट्या अजूनही पूर्णतः सक्षम बनला नाही.

संदर्भ :

१. Dr Chetana V Donglikar (75 years of independence and women in India) Volume - ll, Laxmi Book Publication

२. डॉ सुवर्णा सूर्यवंशी( महिला सबलीकरण) ऑरेंज बुक पब्लिकेशन, भिलाई, छत्तीसगढ २६ जानेवारी २०२१

३. डॉ भालेराव जे के, (सूप्रशासन) एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्यूटर्स, औरंगाबाद

४. प्रा डॉ.संजीव पगारे, ई-बुक एडिशन - जानेवारी २०२२

Publisher -MK INFODUTECH PVT. LTD. PUNE

५. दैनिक पुण्यनगरी, ३ मार्च २०१९, प्रवाह

६. योजना - अंक -२, सप्टेंबर २०१६, मराठी अंक



Scanned with OKEN Scanner



# ❋ लेखकाचा परिचय ❋


डॉ. विलास आबा गायकवाड

❋ शिक्षण : एम. ए. लोकप्रशासन, सेट, नेट, पीएच.डी

❋ नोकरी : सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन विभागप्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम जिल्हा वाशिम


अनुभव-२१ ऑगस्ट २००८ पासून मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम जिल्हा वाशिम येथे कार्यरत

❋ पद :

१. सदस्य : राज्यशास्त्र व लोकप्रशासन अभ्यास मंडळ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती
२. सदस्य : लोकप्रशासन अभ्यास मंडळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
३. सदस्य : लोकप्रशासन अभ्यास मंडळ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
४. सदस्य : लोकप्रशासन अभ्यास मंडळ राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर
५. कार्यकारी सदस्य महाराष्ट्र लोकप्रशासन परिषद

❋ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे लोकप्रशासन विषयाचे एकमेव मान्यता प्राप्त पीएच. डी संशोधन मार्गदर्शक

❋ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड याच्या मानव्यविद्याशाखा अंतर्गत लोकप्रशासन विषयामध्ये 'महाराष्ट्रातील समाज कल्याण प्रशासन आणि स्वयंसेवी संघटना: विशेष संदर्भ पश्चिम विदर्भ' या विषयावर संशोधनकार्यासाठी उच्च शिक्षणातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) ही पदवी प्राप्त

❋ लोकप्रशासन विषयातील विविध विद्यापीठाचे पीएच डी शोध प्रबंधाचे परीक्षक

सहभाग -आतापर्यंत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय २८ चर्चासत्र आणि परिषदामध्ये सहभाग व पेपर वाचन

❋ लिखाण-

१. विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय संशोधन नियतकालिकामधून (जर्नल्स) विविध विषयावर १९ शोध निबंधाचे प्रकाशन

२. I महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन
II महाराष्ट्र प्रशासनाची रूपरेषा
III. भारतीय प्रशासनाची रूपरेषा

या तीन ग्रंथास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या लोकप्रशासन विषयाच्या अभ्यासक्रमास संदर्भ ग्रंथ म्हणून मान्यता)

IV. सामाजिक कल्याण प्रशासन व स्वंयसेवी संस्था हा एक संदर्भ ग्रंथ प्रकाशित

3 I. मानवी हक्क
II.आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाज सुधारकांचे योगदान
III भारताचे परराष्ट्र धोरण: अडथळे व आव्हाने

हे तीन संपादित ग्रंथ

४. दोन संपादित ग्रंथांमध्ये प्रकरणांचे लिखाण


EAGLE LEAP

PRINTERS AND PUBLISHER PRIVATE LIMITED

Office address : SNO 57/4/5 Balaji Colony
Nr. Hanuman Mandir Bijali Nagar
shivnagar Chinchwad ,Pune,
Maharashtra,India,411033.

E-mail : egaleleap.pp@gmail.com
Contact : 8600071634 / 7083766990
Website : www.egaleleap.in
www.researchindex.co.in

ISBN : 978-81-963340-4-8

9 788196 334048



Scanned with OKEN Scanner

EAGLE LEAP
PRINTERS AND PUBLISHER PVT. LTD.

Registration No. : 1919643

# "Women Empowerment, Women Laws And Education In India"

EDITED BOOK

## CERTIFICATE

This is to certify that,

Mr./Mrs/Miss./Dr./ सुरेन्द्र हरीभाऊ किन्हीकर, श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि अमरावती, has Cantributed Chapter/ Research Article in **"Women Empowerment, Women Laws And Education In India"** Published on 20 September 2023. With ISBN No : **978-81-963340-4-8** He/ She Contributed Book Chapter entitle **महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण.**

Mr. Sandesh D. Pahulkar
Publisher
Eagle Leap Printers And Publisher Pvt. Ltd.

ISBN : 978-81-963340-4-8
9 788196 334048

Dr. Vilas Aba Gaikwad
Chief Editor

Scanned with OKEN Scanner